भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

# कैदी अधिनियम, १९००

**(सन १९०० चा अधिनियम क्रमांक ३)**

[दिनांक १० नोव्हेंबर, २००९ रोजी यथाविद्यमान]

# The Prisoners Act, 1900

**(Act No. 3 of 1900)**

[*As in force on the 10th November, 2009* ]

*

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
२०१४

[ किंमत : रुपये १० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १० नोव्हेंबर, २००९ रोजी यथाविद्यमान असलेला दि प्रिझनर्स ॲक्ट, १९०० याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १, अंक १६, दिनांक २८ जुलै, २०११ यात पृष्ठ ३ ते ८ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २८ जुलै, २०११.

**व्ही. के. भसीन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of The Prisoners Act, 1900 as in force on the 10th November, 2009 contains the authoritative test of that Act in Marathi which was published in the *Gazettee of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol.16, dated 28th July, 2011 on pages 3 to 8.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 28th July, 2011.

**V. K. BHASIN.**
Secretary to the Government of India.

# कैदी अधिनियम, १९००

कलमांचा क्रम

**कलमे**

भाग एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. व्याख्या.

भाग दोन

**सर्वसाधारण**

३. कारागृहांच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी त्यांच्या यथोचितरीत्या ताब्यात देण्यात आलेल्या व्यक्तींना अटकावून ठेवणे.

४. कारागृहाच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी प्राधिलेख, इत्यादीच्या अंमलबजावणीनंतर किंवा मुक्ततेनंतर तो परत पाठविणे.

भाग तीन

**इलाखा शहरातील कैदी**

५. अधिपत्रे इ. पोलीस अधिकाऱ्यांना उद्देशून असणे.

६. इलाखा कारागृहाचे अधीक्षक नियुक्त करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

७. उच्च न्यायालयाने कारावासाची किंवा देहांताची शिक्षा दिलेल्या व्यक्तींना सुपूर्द करणे.

८. उच्च न्यायालयाने काळ्या पाण्याची शिक्षा दिलेल्या व्यक्तींना सुपूर्द करणे.

९. हुकूमनाम्याची अंमलबजावणी किंवा अवमान झाला म्हणून उच्च न्यायालयाने व्यक्तींना कारागृहाकडे सुपूर्द करणे.

१०. इलाखा शहर दंडाधिकाऱ्याने शिक्षा दिलेल्या व्यक्तींना सुपूर्द करणे.

११. उच्च न्यायालयाने न्यायचौकशीसाठी पाठवलेल्या व्यक्तींना सुपूर्द करणे.

१२. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ३५० खाली दिवाळखोरीसाठी केलेल्या अर्जाची उच्च न्यायालयाद्वारे सुनावणी होईपर्यंत अभिरक्षेत ठेवणे.

१३. उच्च न्यायालयाच्या वा इलाखा शहरातील दिवाणी न्यायालयाच्या अधिपत्रानुसार अटक केलेल्या व्यक्तींना सुपूर्द करणे.

भाग चार

**इलाखा शहरांबाहेरील कैदी**

१४. या भागातील कारागृहे इ. च्या निर्देशांमध्ये सुधारशाळांचा सुद्धा निर्देश येतो, असा अर्थ लावणे.

१५. कारागृहांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना विवक्षित न्यायालयांच्या शिक्षादेशांची अंमलबजावणी करण्याचा अधिकार.

१६. अशा न्यायालयाच्या अधिकाऱ्याने दिलेले अधिपत्र म्हणजे पुरेसा प्राधिकार असणे.

१७. कारागृहाच्या प्रभारी अधिकाऱ्याला या भागाखाली त्याच्याकडे अंमलबजावणीसाठी पाठवण्यात आलेल्या अधिपत्राच्या वैधतेबद्दल शंका असेल त्याप्रसंगी अनुसरावयाची कार्यपद्धती.

१८. राज्यांत सर्वसाधारणपणे अंलबजावणीयोग्य नसलेल्या विवक्षित मृत्यूशिक्षा आदेशांची त्या राज्यात अंमलबजावणी.

[भाग पाच.—सक्त मजुरीची शिक्षा झालेल्या व्यक्ती कलमे १९-२७ ] निरसित.

भाग सहा

**कैद्यांना हलवणे**

२८. या भागातील कारागृहे, इ. च्या निर्देशांत सुधारशाळांचाही निर्देश येतो, असा अर्थ लावणे.

२९. कैद्यांना हलवणे.

३०. वेडे कैदी कसे सांभाळावयाचे.

३१. [ निरसित ].

भाग सात

**काळ्या पाण्याची शिक्षा झालेल्या व्यक्ती**

३२. काळ्या पाण्याची शिक्षा झालेल्या व्यक्तींना बंदिवासात ठेवण्याची ठिकाणे ठरवून देणे व तेथे त्यांना हलवणे.

भाग आठ

**कैद्यांची मुक्तता**

३३. माफीची शिफारस केलेल्या कैद्याची उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मुचलका घेऊन सुटका.

भाग नऊ

**कैद्यांची उपस्थिती आणि त्यांची साक्ष घेणे हे आवश्यक ठरवणाऱ्या तरतुदी**

३४-५२. कैदी (न्यायालयात उपस्थिती) अधिनियम, १९५५ (१९५५ चा ३२), कलम १० द्वारे निरसित.

५३. [ निरसने ].

[ पहिली अनुसूची ] निरसित.

[ दुसरी अनुसूची ] निरसित.

[ तिसरी अनुसूची ] निरसित.

# कैदी अधिनियम, १९००[१]

## (१९०० चा अधिनियम क्रमांक ३)[२]

(१० नोव्हेंबर २००९ रोजी यथाविद्यमान)

[२ फेब्रुवारी १९००]

**न्यायालयाच्या आदेशावरून बंदिवासात ठेवलेल्या कैद्यांच्या संबंधातील कायदे एकत्रित करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी**, न्यायालयाच्या आदेशावरून बंदिवासात ठेवलेल्या कैद्यांच्या संबंधातील कायदे एकत्रित करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी**, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमिती करण्यात येत आहे :—

भाग एक

**प्रारंभिक**

**संक्षिप्त नाव व विस्तार.**

**१.** (१) या अधिनियमास " कैदी अधिनियम, १९००", असे म्हणता येईल.

[३][(२) [४][जी राज्यक्षेत्रे, १ नोव्हेंबर १९५६ च्या लगतपूर्वी भाग ख राज्यांमध्ये समाविष्ट होती ती ] खेरीजकरून संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे.] [५] * * *

[५] * * * * *

**व्याख्या.**

**२.** या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,—

(क) " न्यायालय " यात, अपमृत्युनिर्णेत्याचा आणि दिवाणी, फौजदारी किंवा महसूलविषयक अधिकारिता विधितः वापरणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो ; आणि

(ख) " कारागृह " यात, राज्य शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे दुय्यम तुरुंग म्हणून जाहीर केलेल्या कोणत्याही ठिकाणाचा समावेश होतो ;

[६][(ग) " राज्ये " याचा अर्थ, ज्या राज्यक्षेत्रांवर या अधिनियमाचा विस्तार आहे ती राज्यक्षेत्रे, असा आहे.]

भाग दोन

**सर्वसाधारण**

**कारागृहांच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी त्यांच्या यथोचितरीत्या ताब्यात देण्यात आलेल्या व्यक्तींना अटकावून ठेवणे.**

**३.** कारागृहाचा प्रभारी अधिकारी, कोणत्याही न्यायालयाने, या अधिनियमान्वये किंवा अन्यथा रीतसर त्याच्या ताब्यात दिलेल्या सर्व व्यक्तींना दाखल करवून घेऊन ज्या कोणत्याही प्राधिलेखान्वये, अधिपत्राअन्वये किंवा आदेशाअन्वये त्यांना कारागृहात पाठवण्यात आले असेल त्यांच्या निकडीप्रमाणे, अथवा अशा व्यक्तींना रीतसर कायद्यानुसार मुक्त केले जाईपर्यंत किंवा हलवण्यात येईपर्यंत अटकावून ठेवील.

**कारागृहाच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी प्राधिलेख, इत्यादीच्या अंमलबजावणीनंतर किंवा मुक्ततेनंतर तो परत पाठविणे.**

**४.** न्यायचौकशीसाठी दिलेले अधिपत्र खेरीजकरून, वर उल्लेखिलेल्या अशा प्रत्येक प्राधिलेखाची, आदेशाची किंवा अधिपत्राची अंमलबजावणी झाल्यानंतर अथवा त्याद्वारे हवाली केलेल्या व्यक्तीला मुक्त केल्यानंतर लगेच कारागृहाचा प्रभारी अधिकारी, असा प्राधिलेख, आदेश किंवा अधिपत्र, त्याची अंमलबजावणी कशी केली किंवा त्याद्वारे हवाली केलेल्या व्यक्तीला अंमलबजावणीपूर्वी हवालतीतून का मुक्त करण्यात आले ते दर्शविणारे प्रमाणपत्र पृष्ठांकित करून व त्यावर स्वतःची सही करून त्यासह, ज्या न्यायालयाद्वारे तो काढण्यात किंवा देण्यात आला असेल त्या न्यायालयाकडे, ते ताबडतोब परत पाठवील.

---

१. १९६८ चा अधिनियम २६, कलम ३ व अनुसूची भाग १ यांद्वारे हा अधिनियम पाँडिचेरीवर विस्तारित करण्यात आला.

२. उद्देश व कारणे यांसाठी पहा:- **भारताचे राजपत्र,** १८९९, भाग पाच, इंग्रजी पृष्ठ १०१; प्रवर समितीच्या अहवालासाठी पहा: **भारताचे राजपत्र,** १९००, इंग्रजी पृष्ठ २३; परिषदेच्या कार्यवाहीसाठी पहा:- **भारताचे राजपत्र,** १८९९, भाग सहा, इंग्रजी पृष्ठे १०२ व २४२ आणि **भारताचे राजपत्र,** १९००, इंग्रजी पृष्ठ २१. हा अधिनियम, १९२७ चा विनियम १ द्वारे अदन वर, मद्रास अधिनियम, १९४९ चा २१ द्वारे मद्रासवर आणि मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम, १९३९ (१९३९ चा ४ ) द्वारे मध्यप्रदेशवर लागू करण्याकरिता त्यात सुधारणा करण्यात आल्यात.

३. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ पोटकलम (२) च्या ऐवजी हा मजकूर घालण्यात आला.

४. विधि अनुकूलन (क्र.२) आदेश, १९५६ द्वारे " भाग ख राज्ये " या मूळ मजकुराऐवजी घातले.

५. निरसन व सुधारणा अधिनियम, १९१४ (१९१४ चा १०) याच्या कलम ३ व अनुसूची दोन द्वारे " आणि " हा शब्द व पोटकलम (३) निरसित करण्यात आले.

६. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे खंड (ग) घालण्यात आला होता त्यापूर्वीच्या खंडाऐवजी विधि अनुकूलन (क्र.२) आदेश, १९५६ द्वारे नवीन खंड घातला.

## भाग तीन

## इलाखा - शहरातील कैदी

**अधिपत्रे, इ. पोलीस अधिकाऱ्यांना उद्देशून असणे.**

**५.** आपली साधारण, असाधारण किंवा अन्य फौजदारी अधिकारिता वापरून उच्च न्यायालयाने एखाद्या व्यक्तीला अटक करण्यासाठी काढलेला प्रत्येक प्राधिलेख किंवा **अधिपत्र** अशा अधिकारितेच्या स्थानिक सीमांमधील पोलीस अधिकाऱ्याला उद्देशून काढले जाईल व तो त्याची अंमलबजावणी करील.

**इलाखा कारागृहाचे अधीक्षक नियुक्त करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.**

**६.** राज्य शासनाला अशा अधिकाऱ्यांची नियुक्ती करता येईल की, ज्यांना या भागान्वये त्यांच्या हवाली केलेले कैदी दाखल करवून घेऊन अटकावून ठेवण्याचा प्राधिकार असेल.

**स्पष्टीकरण.——**अशा तऱ्हेने नियुक्त केला जाणारा कोणताही अधिकारी—मग त्याला कोणत्याही पदनामाने संबोधलेले असो— यात यापुढे त्याचा " अधीक्षक " म्हणून निर्देश केलेला आहे.

**उच्च न्यायालयाने कारावासाची किंवा देहांताची शिक्षा दिलेल्या व्यक्तींना सुपूर्द करणे.**

**७.** जेव्हा उच्च न्यायालयाने आपली मूळ फौजदारी अधिकारिता वापरून एखाद्या व्यक्तीस कारावासाची किंवा देहांताची शिक्षा दिलेली असेल तेव्हा, न्यायालय आपल्या **अधिपत्रासह** त्या व्यक्तीला अधीक्षकाकडे सुपूर्द करण्याची तजवीज करील आणि अधीक्षकाद्वारे अशा **अधिपत्राची** अंमलबजावणी करण्यात येईल आणि अंमलबजावणी झाली की तो, ते **अधिपत्र** उच्च न्यायालयाकडे परत करील.

**उच्च न्यायालयाने काळ्या पाण्याची शिक्षा दिलेल्या व्यक्तींना सुपूर्द करणे.**

**८.** जेव्हा उच्च न्यायालयाने आपली मूळ फौजदारी अधिकारिता वापरून एखाद्या व्यक्तीला काळ्या पाण्याची [१][*****] शिक्षा दिलेली असेल तेव्हा, न्यायालय त्या व्यक्तीला अंतरिम अभिरक्षेसाठी अधीक्षकाकडे सुपूर्द करण्याची तजवीज करील आणि अशा व्यक्तीची काळ्या पाण्याची [१][***] शिक्षा, तिला अशाप्रकारे सुपूर्द करण्यात आल्यापासून सुरू झाली असे मानण्यात येईल.

**हुकूमनाम्याची अंमलबजावणी किंवा अवमान झाला म्हणून उच्च न्यायालयाने व्यक्तींना कारागृहाकडे सुपूर्द करणे.**

**९.** जेव्हा एखाद्या व्यक्तीला उच्च न्यायालयाने एखाद्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी म्हणून किंवा न्यायालयाचा अवमान झाला म्हणून किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे कारागृहात पाठवले असेल तेव्हा, उच्च न्यायालय आपण दिलेल्या हवालतनाम्यासह त्या व्यक्तीला अधीक्षकाकडे सुपूर्द करण्याची तजवीज करील.

**इलाखा शहर दंडाधिकाऱ्याने शिक्षा दिलेल्या व्यक्तींना सुपूर्द करणे.**

**१०.** जेव्हा इलाखा शहर दंडाधिकाऱ्याने एखाद्या व्यक्तीला कारावासाची शिक्षा दिली असेल अथवा शांतता राखण्याबाबत किंवा चांगली वागणूक ठेवण्याबाबत जामीन मिळवू न शकल्यामुळे तिला कारागृहात पाठविले असेल तेव्हा, तो दंडाधिकारी आपण दिलेल्या अधिपत्रासह तिला अधीक्षकाकडे सुपूर्द करण्याची तजवीज करील.

**उच्च न्यायालयाने न्यायचौकशीसाठी पाठवलेल्या व्यक्तींना सुपूर्द करणे.**

**११.** आपल्या मूळ फौजदारी अधिकारितेचा वापर करून उच्च न्यायालयाने न्यायचौकशी करावी यासाठी कोणत्याही दंडाधिकाऱ्याने [२][किंवा जस्टीस ऑफ द पीस याने] पाठविलेल्या प्रत्येक व्यक्तीला, अधीक्षकाने, तिला न्यायचौकशीसाठी न्यायालयासमोर हजर करावे असे अधीक्षकाला निदेशित करणाऱ्या अधिपत्रासह त्याच्या ताब्यात देण्यात येईल, आणि अशा व्यक्तीच्या बाबतीत कायद्यानुसार कार्यवाही व्हावी म्हणून शक्य तितक्या लवकर, अधीक्षक तिला अधिपत्रासह न्यायालयासमोर त्याच्या फौजदारी सत्राच्यावेळी नेण्याची तजवीज करील.

**दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ३५० खाली दिवाळखोरीसाठी केलेल्या अर्जाची उच्च न्यायालयाद्वारे ऋणकोला सुनावणी होईपर्यंत अभिरक्षेत ठेवणे.**

**१२.** दिवाणी प्रक्रिया संहिता (१८८२ चा १४) हिच्या [३][कलम ३५०] खाली दिवाळखोरी जाहीर करण्यासाठी केलेल्या कोणत्याही अर्जाची सुनावणी होईपर्यंत उच्च न्यायालय, जामिनावर सुटका करण्याविषयी उक्त संहितेच्या [३][कलम ३४९ मध्ये] असलेल्या तरतुदींच्या अधीनतेने संबंधित न्यायनिर्णीत ऋणकोला अधीक्षकाकडे सुपूर्द करण्याची तजवीज करू शकेल; आणि उच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरून न्यायनिर्णीत-ऋणकोला उच्च न्यायालयासमोर घेऊन जाण्याकरिता त्या न्यायालयाच्या एखाद्या अधिकाऱ्याकडे त्याला परत सुपूर्द केले जाईपर्यंत किंवा रीतसर कायद्यानुसार त्याची सुटका होईपर्यंत अधीक्षक त्याला सुरक्षित अभिरक्षेत ठेवील.

---

१. फौजदारी कायदा (वांशिक भेदभाव उच्चाटन )अधिनियम, १९४९ (१९४९ चा १७), याच्या कलम ४ द्वारे मूळ मजकूर वगळण्यात आला (६ एप्रिल १९४९ रोजी व तेव्हापासून).

२. अपमृत्यूनिर्णेता (सुधारणा) अधिनियम , १९०८ (१९०८ चा ४), कलम १३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

३. प्रादेशिक नादारी अधिनियम, १९२० (१९२० चा ५) याच्याही बाबतीत हा निर्देश लागू आहे असा त्याचा अर्थ करावा. त्या अधिनियमाचे कलम ८३ (२) पहावे.

**१३.** (१) आपली मूळ दिवाणी अधिकारिता वापरून उच्च न्यायालयाने दिलेला प्राधिलेख, अधिपत्र किंवा आदेश यानुसार, अथवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली किंवा अधिनियमितीखाली इलाखा शहरात स्थापन झालेल्या कोणत्याही दिवाणी न्यायालयाच्या अधिपत्रानुसार, अथवा कलम ५ खाली काढलेल्या अधिपत्रानुसार अटक केलेल्या प्रत्येक व्यक्तीला, ज्या न्यायालयाने अथवा ज्या न्यायालयाच्या न्यायाधीशाने प्राधिलेख, अधिपत्र किंवा आदेश काढला असेल किंवा दिला असेल त्या न्यायालयाची अथवा त्या न्यायालयाच्या एखाद्या न्यायाधीशाची मूळ अधिकारितेतील काम पहाण्यासाठी बैठक चालू असेल तर, त्या न्यायालयासमोर अथवा त्या न्यायाधीशासमोर विनाविलंब आणण्यात येईल.

**उच्च न्यायालयाच्या वा इलाखा शहरातील दिवाणी न्यायालयाच्या अधिपत्रानुसार अटक केलेल्या व्यक्तींना सुपूर्द करणे.**

(२) जर उक्त न्यायालयाची अथवा त्याच्या न्यायाधीशाची त्यावेळी मूळ अधिकारितेतील काम पाहण्यासाठी बैठक चालू नसेल तर, वर सांगितल्याप्रमाणे अटक केलेल्या व्यक्तीला अंतरिम अभिरक्षेसाठी, उक्त न्यायालयाच्या न्यायाधीशाने अन्यथा निदेश दिलेला नसल्यास अधीक्षकाकडे सुपूर्द करण्यात येईल, आणि अशा व्यक्तीबाबत कायद्यानुसार कार्यवाही व्हावी यासाठी तिला उक्त न्यायालयाची किंवा त्याच्या न्यायाधीशाची मूळ अधिकारितेतील काम पाहण्यासाठी जी पुढील बैठक होईल त्यावेळी त्या न्यायालयासमोर किंवा त्या न्यायाधीशासमोर आणण्यात येईल, आणि त्या प्रयोजनासाठी सर्व आवश्यक ते आदेश देण्याचा किंवा अधिपत्रे काढण्याचा अधिकार उक्त न्यायालयाला अथवा न्यायाधीशाला असेल.

## भाग चार

## इलाखा शहरांबाहेरील कैदी

**१४.** या भागामध्ये कारागृह किंवा कारावास किंवा बंदिवास यांचे जे निर्देश आले आहेत त्या सर्वांमध्ये, सुधारशाळा किंवा तेथील स्थानबद्धता यांचा देखील निर्देश येतो, असा त्यांचा अर्थ लावण्यात येईल.

**या भागातील कारागृहे इ. च्या निर्देशांमध्ये सुधारशाळांचा सुद्धा निर्देश येतो, असा अर्थ लावणे.**

[१][**१५.** (१) इलाखा-शहराबाहेरील कारागृहांचे प्रभारी अधिकारी हे,—

(क) केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या किंवा म्यानमार सरकारच्या सर्वसाधारण किंवा विशेष प्राधिकाराअन्वये राज्यांमध्ये किंवा राज्याबाहेर कार्य करणाऱ्या कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने अथवा संविधानाच्या प्रारंभापूर्वी हिज मॅजेस्टीच्या किंवा क्राऊन रिप्रेझेंटेटिव्हच्या सर्वसाधारण किंवा विशेष प्राधिकारान्वये कार्य करणाऱ्या कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने ; किंवा

(ख) २६ जानेवारी १९५० पूर्वी कोणत्याही भारतीय संस्थानातील कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने—

(एक) जर अध्यक्ष न्यायाधीश , अथवा न्यायालय किंवा न्यायाधिकरण दोन किंवा अधिक न्यायाधीश मिळून बनलेले असल्यास त्यापैकी निदान एक न्यायाधीश म्हणजे असा न्यायाधीश म्हणून काम पहाण्यास त्या संस्थानाने किंवा त्याच्या अधिपतीने किंवा केंद्र सरकारने किंवा क्राऊन रिप्रेझेंटेटिव्हने प्राधिकृत केलेला क्राऊनचा अधिकारी असताना; आणि

(दोन) अशा कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने शिक्षा दिलेल्या व्यक्तींना भारताच्या कोणत्याही प्रांतातील कारागृहात दाखल करवून घेण्यास, स्थानबद्ध करण्यास किंवा कारावासात ठेवण्यात राज्य शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे मान्यता दिलेली असताना,

दिलेला किंवा काढलेला कोणताही शिक्षादेश किंवा आदेश किंवा अधिपत्र यांची अंमलबजावणी करू शकतील :

[२][* * * * * * * * * * * * * * * *]

परंतु, म्यानमारमधील कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने स्थानबद्धतेकरता दिलेला किंवा काढलेला कोणताही शिक्षादेश किंवा आदेश किंवा अधिपत्र यांची अंमलबजावणी संबंधित राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीशिवाय केली जाणार नाही.

**[१][कारागृहांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना विवक्षित न्यायालयांच्या शिक्षादेशांची अंमलबजावणी करण्याचा अधिकार.]**

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ कलमाऐवजी दाखल करण्यात आले.

२. अनुकूलन आदेश (क्र.२) १९५६ द्वारे “ किंवा ” हा शब्द व खंड (ग) गाळण्यात आला.

(२) जेथे पूर्वोक्त अशा भारतीय संस्थानाच्या न्यायालयाने अथवा न्यायाधिकरणाने असा शिक्षादेश दिलेला असून क्राऊनच्या अधिकाऱ्याच्या सहमतीशिवाय तो अंमलात आणला जाणे शक्य नव्हते अशा प्रकारचा तो असेल आणि असा शिक्षादेश त्या संबंधात विशेषेकरून प्राधिकृत करण्यात आलेल्या अशा कोणत्याही अधिकाऱ्याने त्याचे गुणावगुण विचारात घेऊन तो कायम केलेला असेल तर, तो व त्याला अनुसरून काढण्यात आलेला कोणताही आदेश किंवा अधिपत्र हे केंद्र सरकारच्या किंवा क्राऊन रिप्रेझेंटेटिव्हच्या प्राधिकाराअन्वये कार्य करणाऱ्या न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा शिक्षादेश, आदेश किंवा अधिपत्र आहे असे मानण्यात येईल.]

**अशा न्यायालयाच्या अधिकाऱ्याने दिलेले अधिपत्र म्हणजे पुरेसा प्राधिकार असणे.**

**१६.** कलम १५ मध्ये उल्लेखिलेल्या अशा न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाच्या अधिकाऱ्याच्या अधिकृत स्वाक्षरीचे अधिपत्र एखाद्या व्यक्तीला तिच्या संबंधाने देण्यात आलेल्या शिक्षादेशाला अनुसरून, बंदिवासात ठेवण्यासाठी किंवा काळ्या पाण्याच्या शिक्षेवर पाठवण्यासाठी पुरेसा प्राधिकार असेल.

**कारागृहाच्या प्रभारी अधिकाऱ्याला या भागाखाली त्याच्याकडे अंमलबजावणीसाठी पाठवण्यात आलेल्या अधिपत्राच्या वैधतेबद्दल शंका असेल त्याप्रसंगी अनुसरावयाची कार्यपद्धती.**

**१७.** (१) जेव्हा कारागृहाच्या प्रभारी अधिकाऱ्याला या भागाखाली त्याच्याकडे अंमलबजावणीसाठी पाठवण्यात आलेल्या अधिपत्र किंवा आदेशाच्या वैधतेबद्दल, अथवा त्या अधिपत्रावर किंवा आदेशावर ज्या व्यक्तीची अधिकृत मुद्रा किंवा स्वाक्षरी असेल ती व्यक्ती तो शिक्षादेश देण्यास व **अधिपत्र** किंवा आदेश काढण्यास कितपत सक्षम आहे याबद्दल शंका असेल तेव्हा, ती बाब तो राज्य शासनाकडे निर्देशित करील आणि त्या प्रकरणी शासनाने दिलेला आदेश कैद्याच्या पुढील व्यवस्थेसंबंधात त्या अधिकाऱ्याला व इतर सर्व लोकअधिकाऱ्यांना मार्गदर्शक होईल.

(२) पोटकलम (१) खाली निर्देशित केलेल्या बाबींवर निर्णय प्रलंबित असेपर्यंत कैद्याला अधिपत्रात किंवा आदेशात विनिर्दिष्ट केले असेल त्याप्रमाणे तशा रीतीने व तसे निर्बंध घालून किंवा सौम्य करून स्थानबद्ध करण्यात येईल.

**राज्यांत सर्वसाधारणपणे अंमलबजावणीयोग्य नसलेल्या विवक्षित मृत्यूशिक्षा आदेशांची त्या राज्यात अंमलबजावणी.**

**१८.** (१) [१][केंद्र सरकारच्या प्राधिकारान्वये स्थापन झालेल्या न्यायालयाने ] राज्यांच्या सीमामधील किंवा बाहेरील राज्यक्षेत्रात [२][[३] केंद्र सरकारला ] असलेली अधिकारिता त्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या संबंधात वापरून

(क) एखाद्या व्यक्तीला देहांताची शिक्षा दिलेली असेल, आणि

(ख) अशा व्यक्तीला या बंदिवासासाठी अशा राज्यक्षेत्रात सुरक्षित जागा नाही किंवा सभ्य व माणुसकीला साजेशा रीतीने त्याला फाशी देण्याचे योग्य साधन नाही या कारणामुळे, राज्यांत त्या शिक्षेची अंमलबजावणी करावी, असे त्या न्यायालयाचे मत असल्यामुळे त्याने राज्यातील एखाद्या कारागृहाच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे अशा शिक्षेच्या अंमलबजावणीसाठी अधिपत्र पाठवले असेल तर,

असा अधिकारी, अधिपत्र मिळाल्यावर, त्यात विहित केले असेल अशा ठिकाणी फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ याच्या कलम ३८१ च्या तरतुदींखाली जणू काही ते अधिपत्र रीतसर काढण्यात आलेले असावे त्याप्रमाणे सर्वस्वी त्याच रीतीने आणि त्याच शर्तींच्या अधीनतेने फाशीची शिक्षा अंमलात आणवील.

(२) ज्या कारागृहांच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी पूर्वोक्त अशा कोणत्याही अधिपत्राखालील शिक्षांची अंमलबजावणी करावयाची ती कारागृहे, [४][प्रत्येक राज्यातील राज्य शासन] सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांद्वारे निदेशित करील असे असतील.

[५][* * * * ** ]

भाग पाच

**सक्त मजुरीची शिक्षा झालेल्या व्यक्ती कलमे १९-२७**

फौजदारी कायदा (वांशिक भेदभाव दूर करणे ) अधिनियम, १९४९ (१९४९ चा १७)

कलम ४ द्वारे निरसित (६ एप्रिल १९४९ रोजी व तेव्हापासून).

---

१. अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे "ब्रिटिश न्यायालयाने" या शब्दाऐवजी घातले.

२. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गव्हर्नर जनरल इन कौन्सिल" या शब्दांऐवजी घातले.

३. अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे "क्राऊनला" या शब्दाऐवजी घातले.

४. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

५. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे पोटकलम (३) व त्याचे परंतुक गाळले.

## भाग सहा

### कैद्यांना हलवणे

**२८.** या भागात, कारागृहे किंवा कारावास किंवा बंदिवास यांचे जे निर्देश आले आहेत त्या सर्वांमध्ये, सुधारशाळा किंवा तेथील स्थानबद्धता यांचाही निर्देश येतो, असा त्यांचा अर्थ लावण्यात येईल.

**या भागातील कारागृहे, इ. च्या निर्देशांत सुधारशाळांचाही निर्देश येतो, असा अर्थ लावणे.**

[१]**[२९.** (१) [२][राज्य शासन ] —

(क) मृत्युशिक्षादेशाअन्वये, किंवा

(ख) कारावासाच्या शिक्षादेशान्वये किंवा काळ्या पाण्याच्या शिक्षादेशान्वये, किंवा त्या दोहोंऐवजी दिलेल्या शिक्षादेशान्वये,

(ग) द्रव्यदंड भरण्यात कसूर केल्याबद्दल, किंवा

(घ) शांतता राखण्याबद्दल किंवा चांगली वागणूक ठेवण्याबद्दल प्रतिभूति देण्यात कसूर केल्याबद्दल,

कारागृहात बंदिस्त केलेल्या एखाद्या कैद्याला [३][त्या राज्यातील ] अन्य कोणत्याही कारागृहात [४][***] हलवण्यासाठी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांद्वारे तरतूद करू शकेल.

**कैद्यांना हलवणे.**

(२) [५][ राज्य शासनाच्या आदेशांच्या अधीनतेने, आणि त्याच्या नियंत्रणाखाली ] महानिरीक्षक कारागृहे, हा पूर्वी म्हटल्याप्रमाणे एखाद्या कारागृहात बंदिवासात ठेवलेल्या कोणत्याही कैद्याला राज्यातील अन्य कोणत्याही कारागृहात [६][***] हलवण्यासाठी तरतूद करू शकेल.]

**३०.** (१) एखाद्या न्यायालयाच्या कोणत्याही आदेशाखाली किंवा शिक्षादेशाखाली स्थानबद्ध केलेली किंवा कारावासात ठेवलेली एखादी व्यक्ती विकल मनाची आहे असे जेव्हा राज्य शासनाला दिसून येईल तेव्हा, ती व्यक्ती विकल मनाची आहे असे समजण्यास आधारभूत असणारी कारणे देऊन **अधिपत्राद्वारे** राज्य शासन असा आदेश देऊ शकेल की, त्या व्यक्तीला त्या राज्यातील एखाद्या पागलखान्यात किंवा सुरक्षित अभिरक्षेत राहील अशा इतर कोणत्याही ठिकाणी हलवावे आणि जितक्या मुदतीकरता तिला स्थानबद्धतेस किंवा कारावासात ठेवण्याचा आदेश किंवा शिक्षादेश देण्यात आलेला असेल त्यापैकी उर्वरित काळात अथवा ती मुदत संपल्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्याने जर, खुद्द कैद्याच्या किंवा इतरांच्या सुरक्षिततेसाठी तिला वैद्यकीय देखभाल किंवा उपचार यांसाठी आणखी काही काळ अटकावून ठेवणे आवश्यक आहे असे प्रमाणित केले तर कायद्यानुसार त्याची मुक्तता होईपर्यंत, राज्य शासन निदेशित करील त्याप्रमाणे तेथे तिला ठेवावे आणि तिच्यावर उपचार करावेत असा आदेश देऊ शकेल.

**वेडे कैदी कसे सांभाळावयाचे.**

(२) कैदी निकोप मनाचा झालेला आहे असे राज्य शासनाला आढळून येईल तेव्हा, तो कैदी जिच्या स्वाधीन असेल त्या व्यक्तीला उद्देशून काढलेल्या **अधिपत्राद्वारे** राज्य शासन तो कैदी त्यानंतरही हवालतीत राहण्यास पात्र असेल तर, ज्या कारागृहातून त्याला हलवण्यात आले होते त्या किंवा, राज्यातील दुसऱ्या कारागृहात त्याला परत पाठवील अथवा कैदी आणखी अधिक काळ हवालतीत राहण्यास पात्र नसेल तर त्याला मुक्त करण्याचा आदेश देईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये पागलखान्यात बंदिवासात ठेवण्यात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत, जितक्या मुदतीकरता तिला स्थानबद्धतेत किंवा कारावासात ठेवण्याचा आदेश किंवा शिक्षादेश काढलेला असेल ती मुदत संपल्यानंतर [७]पागलखाने अधिनियम, १८५८ (१८५८ चा ३६) याच्या कलम ९ च्या तरतुदी लागू होतील आणि त्या पोटकलमाखाली जितका काळ कैद्याला पागलखान्यात बंदिवासात ठेवण्यात आले असेल तो काळ, जितक्या मुदतीची स्थानबद्धता किंवा कारावास भोगण्याबद्दल न्यायालयाने आदेश किंवा शिक्षादेश दिलेला असेल त्या मुदतीचा भाग म्हणून गणला जाईल.

---

१. १९०३ चा अधिनियम १, कलम ३ व अनुसूची दोन द्वारे मूळ कलमाऐवजी घातले.

२. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गव्हर्नर जनरल इन कौन्सिल" या शब्दाऐवजी घातले.

३. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

४. कैदी स्थानांतरण अधिनियम, १९५० (१९५० चा २९), याच्या कलम ४ द्वारे मूळ मजकूर गाळला.

५. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

६. वरील आदेशाद्वारे मूळ मजकूर वगळण्यात आला.

७. भारतीय वेडाबाबत अधिनियम, १९१२ (१९१२ चा ४) पहा.

[१][ (४) कैद्याला राज्यातील एखाद्या पागलखान्यात किंवा सुरक्षित अभिरक्षेत राहील अशा अन्य कोणत्याही ठिकाणी हलवण्याचा आदेश देण्यास राज्य शासन पोटकलम (१) अन्वये सक्षम असेल अशा कोणत्याही बाबतीत, राज्य शासन अन्य कोणत्याही राज्यातील किंवा [२][ भारताच्या ज्या कोणत्याही भागाला हा अधिनियम लागू होत नाही तेथील ] अशा कोणत्याही पागलखान्यात किंवा ठिकाणी त्याला हलवण्यासाठी, अशा अन्य राज्याच्या राज्य शासनाशी [३][****] करार करून आदेश देऊ शकेल, आणि पोटकलम (१) अन्वये हलवलेल्या कैद्याची अभिरक्षा, स्थानबद्धता, परती आणि मुक्तता यासंबंधी या कलमाच्या तरतुदी जेथवर त्या लागू करणे शक्य असेल तेथवर, या पोटकलमाअन्वये हलवलेल्या कैद्याला लागू होतील.]

**३१.** [एका स्थानिक शासनाच्या अखत्यारीतील राज्यक्षेत्रांतून दुसऱ्या स्थानिक शासनाच्या अखत्यारीतील राज्यक्षेत्रांत कैद्यांना हलवणे] —— सुधारणा अधिनियम, १९०३ (१९०३ चा १ ) याच्या कलम ४ व अनुसूची तीनद्वारे निरसित.

## भाग सात

## काळ्या पाण्याची शिक्षा झालेल्या व्यक्ती

**काळ्या पाण्याची शिक्षा झालेल्या व्यक्तींना बंदिवासात ठेवण्याची ठिकाणे ठरवून देणे व तेथे त्यांना हलवणे.**

**३२.** [४][(१)] काळ्या पाण्याची शिक्षा झालेल्या व्यक्तींना [५][ राज्यामधील ] ज्या ठिकाणी पाठवावयाचे ती ठिकाणे [७][ राज्य शासन ] ठरवून देऊ शकेल; आणि [६][ राज्य शासन ], किंवा [६][ राज्य शासनाने ] याबाबत योग्यरीत्या प्राधिकृत केलेला अधिकारी अन्य अपराधांकरता पूर्वी दिलेल्या शिक्षादेशान्वये आधीच काळ्या पाण्याची शिक्षा भोगत असलेल्या व्यक्तीला काळ्या पाण्याचा शिक्षादेश दिला गेल्यास तेवढा अपवाद खेरीज करून, अशा व्यक्तींना अशा रीतीने अशा ठरवलेल्या ठिकाणी हलवण्याचे आदेश देईल.

[५][(२) काळ्या पाण्याची शिक्षा झालेल्या व्यक्तींना राज्यामधील ज्या ठिकाणी पाठवावयाचे ती ठिकाणे ठरवून देण्यास आणि अशा व्यक्तींना त्या ठिकाणी हलवण्याचे आदेश देण्यास राज्य शासन पोटकलम (१) अन्वये सक्षम असेल अशा कोणत्याही बाबतीत, राज्य शासन अन्य कोणत्याही राज्याच्या राज्य शासनाशी करार करून, त्या राज्यातील अशी ठिकाणे ठरवून देऊ शकेल, आणि तशा व्यक्तींना तेथे हलवण्याबाबत तशाच कराराद्वारे आदेश देऊ शकेल किंवा तसे आदेश देण्यास एखाद्या अधिकाऱ्याला रीतसर प्राधिकृत करू शकेल.]

## भाग आठ

## कैद्यांची मुक्तता

**माफीची शिफारस केलेल्या कैद्याची उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मुचलका घेऊन सुटका.**

**३३.** [८][कोणत्याही उच्च न्यायालयाने] एखाद्या कैद्याला बिनशर्त माफी देण्याची शिफारस जर एखाद्या प्रकरणी [९][ शासनाकडे ] केलेली असेल तर त्या बाबतीत, [८][ते उच्च न्यायालय ], त्या कैद्याला त्याचा स्वतःच्या मुचलका घेऊन मुक्त करण्यास परवानगी देऊ शकेल.

## भाग नऊ

## कैद्यांची उपस्थिती आणि त्यांची साक्ष घेणे हे आवश्यक ठरवणाऱ्या तरतुदी

**३४-५२** कैदी (न्यायालयात उपस्थिती) अधिनियम, १९५५ (१९५५ चा ३२ ), कलम १० द्वारे निरसित.

**५३.** **[निरसने]** निरसन व सुधारणा अधिनियम, १९१४ (१९१४ चा १०), कलम ३ व अनुसूची दोन द्वारे निरसित.

**[पहिली अनुसूची]** —— कैदी (न्यायालयात उपस्थिती) अधिनियम, १९५५ (१९५५ चा ३२ ), कलम १० द्वारे निरसित.

**[दुसरी अनुसूची]** —— वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे निरसित.

**[तिसरी अनुसूची]** —— निरसन व सुधारणा अधिनियम, १९१४ ( १९१४ चा १०), कलम ३ व अनुसूची दोन द्वारे निरसित.

---

१. प्रक्रांति (डिव्होल्यूशन ) अधिनियम, १९२० (१९२० चा ३८) याचे कलम २ व अनुसूची १ द्वारे मूळ पोटकलम (४) ऐवजी घातले.

२. विधि अनुकूलन (क्र.२) आदेश, १९५६ द्वारे, “कोणत्याही भाग ख राज्यातील”, या शब्दांऐवजी घातले.

३. वरील अनुकूलन आदेशाद्वारे किंवा अशा राज्यांशी किंवा यथास्थिती त्याच्या सत्ताधाऱ्यांशी हा मजकूर वगळण्यात आला, जो अनुकूलन आदेश, १९३७ अन्वये घालण्यात आला आहे.

४. प्रक्रांति (डिव्होल्युशन) अधिनियम, १९२० (१९२० चा ३८), कलम २ व अनुसूची १ द्वारे कलम ३२ ला पोटकलम (१) असा नवीन क्रमांक दिला.

५. वरील अधिनियमाच्या कलम २ व अनुसूची १, भाग एक द्वारे मूळ मजकुराऐवजी घालण्यात आले.

६. वरील अधिनियमाच्या कलम २ व अनुसूची १ द्वारे पोटकलम (२) घालण्यात आले.

७. वरील अधिनियमाच्या कलम २ व अनुसूची १ द्वारे पोटकलम (२) घालण्यात आले.

८. विधि अनुकूलन (क्रमांक २ ) आदेश, १९५६ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

९. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

# कैदी अधिनियम, १९००

# The Prisoners Act, 1900

इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| confinement | बंदिवास | [ sec. 14 ] |
| coroner | अपमृत्युनिर्णेता | [ sec. 2 (*a*) ] |
| criminal session | फौजदारी सत्र | [ sec. 11 ] |
| discharge from custody | हवालतीतून मुक्त करणे | [ sec. 4 ] |
| execution of decree | हुकूमनाम्याची अंमलबजावणी | [ sec. 9 ] |
| imprisonment | कारावास | [ sec. 14 ] |
| in due course of law | रीतसर कायद्यानुसार | [ sec. 3 ] |
| insolvency | दिवाळखोरी | [ sec. 12 ] |
| original criminal jurisdiction | मूळ फौजदारी अधिकारिता | [ sec. 7 ] |
| original jurisdiction | मूळ अधिकारिता | [ sec. 13(2) ] |
| Presidency Magistrate | इलाखा शहर दंडाधिकारी | [ sec. 10 ] |
| presidency prisons | इलाखा कारागृहे | [ sec. 6 ] |
| presidency-town | इलाखा शहर | [ sec. 13(1) ] |
| prisons | कारागृह | [ sec. 2(b) ] |
| prisoner | कैदी | [ sec. 1 ] |
| reformatory schools | सुधारशाळा | [ sec. 14 ] |
| removal of racial discriminations | वांशिक भेदभाव दूर करणे | [ Part V ] |
| revenue jurisdiction | महसूलविषयक अधिकारिता | [ sec. 2(*a*) ] |
| sentenced to transporation | काळ्या पाण्याची शिक्षा | [ sec. 8 ] |
| subsidiary jail | दुय्यम तुरूंग | [ sec. 2(*b*) ] |
| the officer incharge of prison | कारागृहाचा प्रभारी अधिकारी | [ sec. 3 ] |
| warrant | अधिपत्र | [ sec. 3 ] |
| warrant of commitment | हवालतनामा | [ sec. 9 ] |
| writs | प्राधिलेख | [ sec. 3 ] |

# कैदी अधिनियम, १९००

# The Prisoners Act, 1900

मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिपत्र | warrant | [ कलम ३ ] |
| अपमृत्यूनिर्णेता | coroner | [ कलम २(क) ] |
| इलाखा कारागृहे | presidency prisons | [ कलम ६ ] |
| इलाखा शहर | presidency-town | [ कलम १३(१) ] |
| इलाखा शहर दंडाधिकारी | Presidency Magistrate | [ कलम १० ] |
| कारागृह | prisons | [ कलम २(ख) ] |
| कारागृहाचा प्रभारी अधिकारी | the officer incharge of a prison | [ कलम ३ ] |
| कारावास | imprisonment | [ कलम १४ ] |
| काळ्या पाण्याची शिक्षा | sentenced to transportation | [ कलम ८ ] |
| कैदी | prisoner | [ कलम १ ] |
| दिवाळखोरी | insolvency | [ कलम १२ ] |
| दुय्यम तुरूंग | subsidiary jail | [ कलम २(ख) ] |
| प्राधिलेख | writs | [ कलम ३ ] |
| फौजदारी सत्र | a criminal session | [ कलम ११ ] |
| बंदिवास | confinement | [ कलम १४ ] |
| महसूलविषयक अधिकारिता | revenue jurisdiction | [ कलम २(क) ] |
| मूळ अधिकारिता | original jurisdicrion | [ कलम १३(२) ] |
| मूळ फौजदारी अधिकारिता | original criminal jurisdiction | [ कलम ७ ] |
| रीतसर कायद्यानुसार | in due course of law | [ कलम ३ ] |
| वांशिक भेदभाव दूर करणे | removal of racial discriminations | [ भाग पाच ] |
| सुधारशाळा | reformatory schools | [ कलम १४ ] |
| हवालतनामा | warrant of commitment | [ कलम ९ ] |
| हवालतीतून मुक्त करणे | discharge from custody | [ कलम ४ ] |
| हुकूमनाम्याची अंमलबजावणी | excution of decree | [ कलम ९ ] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
  महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मार्ग,
  **मुंबई ४०० ००४.**
  दूरध्वनी : ०२२–२३६३ २६ ९३, २३६३ ०६ ९५
  २३६३ ११ ४८, २३६३ ४० ४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. जवळ,
  **पुणे ४११ ००१.**
  दूरध्वनी : ०२०–२६१२ ५८०८, २६१२ ४७ ५९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हिल लाइन्स,
  **नागपूर ४४० ००१.**
  दूरध्वनी : ०७१२–२५६२ ६१५

- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  **औरंगाबाद ४३१ ००१.**
  दूरध्वनी : ०२४०–२३३१ ४६८, २३३१ ५२५

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
  ताराबाई पार्क,
  **कोल्हापूर ४१६ ००३.**
  दूरध्वनी : ०२३१–२६५० ३९५, २६५० ४०२

**आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**